# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट क्रमांक :- १०६-२२ दिनांक :- १६/०४/२०२२

## ८८ ग्रॅम वजनाचा एम.डी. (मॅफेड्रॉन) हा अंमली पदार्थ बाळगणा-या सराईत आरोपीसह ३ आरोपीतांना अटक- अंमली पदार्थ विरोधी कक्षाची कारवाई.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे अंतर्गत असलेल्या अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे अधिकारी यांना गुप्त बातमीदारामार्फत खात्रीशीर माहिती मिळाली की, नालासोपारा (पश्चिम), हनुमान नगर परिसरात एक ईसम त्याचे राहते घरी व तेथील परिसरात मॅफेड्रॉन हा अंमली पदार्थ विक्री करीत आहे. सदर मिळालेल्या बातमीप्रमाणे कायदेशीर बाबींची पुर्तता करुन हनुमान नगर परिसरात दिनांक १५/०४/२०२२ रोजी सापळा रचुन कारवाई केली असता ईसम नामे १) एहतेशाम मोहम्मद रफिक अन्सारी रा. रु स्काय हाईटस अपार्टमेंट, हनुमान नगर नालासोपारा (पश्चिम) २) मुस्ताक मोहम्मद सईद खान रा. साई सृष्टी अपार्टमेंट, हनुमान नगर नालासोपारा (पश्चिम) व ३) मोहम्मद नबी उस्मान कुरेशी, रा. साई सिटी अपार्टमेंट, हनुमान नगर नालासोपारा (पश्चिम) यांचे कब्ज्यात अनुक्रमे ६० ग्रॅम , १८ ग्रॅम व १० ग्रॅम असा एकुण ८८ ग्रॅम वजनाचा ७,०४,०००/-रु. किंमतीचा मॅफेड्रॉन हा अंमली पदार्थ विक्रीकरीता बाळगला असतांना मिळुन आला असुन त्यांचेकडुन नमुद अंमली पदार्थ जप्त करण्यात आला आहे. एहतेशाम मोहम्मद रफिक अन्सारी यापुर्वी १) नालासोपारा पोलीस ठाणे गुन्हा नोंद क्र. ाा १९२/२०१८ एन.डी.पी.एस. कायदा १९८५ चे कलम ८ (क), २०, २२ प्रमाणे २) नालासोपारा पोलीस ठाणे गुन्हा नोंद क्र. ाा ३०/२०२१ एन.डी.पी.एस. कायदा १९८५ चे कलम ८ (क), २२ प्रमाणे प्रमाणे २ गुन्हे दाखल आहे. संपुर्ण कारवाई दरम्यान एकुण ७,६७,३००/-रु. किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन नमुद ईसमाविरुध्द अंमली पदार्थ कायदा कलम ८ (क), २१ (क), २९ प्रमाणे नालासोपारा पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद क्र. ाा १४३/२०२२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन सदर ३ आरोपींना अटक करण्यात आली आहे व पुढील तपास नालासोपारा पोलीस ठाण्याकडुन चालु आहे.

सदरची कारवाई डॉ. महेश पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे पोलीस निरीक्षक श्री. देवीदास हंडोरे, सहा. पोलीस निरीक्षक श्री. विलास कुटे, पो.हवा. धनाजी इंगळे, पवन पाटील, प्रदीप टक्के, अजय सपकाळ, विष्णु घरबुडे, सुभाष आव्हाड, पो.शि. अजय यादव यांनी केली आहे.